# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 31/08/2023 (गुरूवार) दुपार

---

### चोरी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा धानोली शिवार येथे दिनांक २९/०८/२०२३ वा. चे २३.३० वा. ते दिनांक ३०/०८/२०२३ चे ०४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– उमेश ताराचंद गोडे, वय ४३ वर्ष रा. धानोली ता. कुही हे रात्री जेवन करून झोपले असता पहाटे ०४/३० वा. गावातील राहणारा अक्षय ढगे यांनी फोन केला की तुझा घरासमोर एक पांढऱ्या रंगाची पिकअप उभी आहे. त्या गाडीमध्ये काहीतरी लोखंडी वस्तु ठेवत आहेत असे म्हटल्यावरून फिर्यादीने उठुन पाहीले असता एक पांढऱ्या रंगाची पिकअप फिर्यादीला पाहुन पळुन गेली फिर्यादीने तिचा पाठलाग केला असता ती जोराने पळुन गेले घरी येवुन पाहणी केली असता पोर्चमध्ये १० जनरेटर पैकी १५०० आरपीएमचे सोनालीका कंपनीचे ०२ जनरेटर जुने वापरते किंमती ५०,०००/– रू. एकुण किंमती १,००,०००/–रू. व ०२ डायनामा जुने वापरते प्रत्येकी किंमती २०,०००/– रू असा एकुण किंमती ४०,०००/–रू असा एकुण १,४०,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके पो.स्टे. कुही हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक २७/०७/२०२३ चे ०१.०० वा. ते ०६.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे– करण विनायक बिरजारक, रा. सावनेर याने फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष ११ महिने हिच्या अल्पवयाचा फायदा घेत प्रेमात फसविले पिडीतेची ईच्छा नसतांना तिला जबरदस्तीने फिरायला नेवुन एका हॉटेलमध्ये जबरदस्तीने तिचे ईच्छेविरूध्द पिडीतेसोबत शारीरीक संबंध प्रस्थापीत केले. पिडीताने आरोपीस नकार देत असल्याने आरोपी हा पिडीतेची बदनामी व स्वत: मरण्याची धमकी देत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (एन), ५०६ भांदवि सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम मो. नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

# विनयभंग

**पो.स्टे. बेला :–** दिनांक ३०/०८/२०२३ चे १६.३० वा. दरम्यान फिर्यादी हि आपले घरासमोर तीची मुलगी हिला घेवून बसली असता यातील आरोपी नामे– मारोती सोमाजी मसराम, वय २७ वर्ष, रा. सालाईराणी ता. उमरेड जि. नागपूर हा दारू पिवून फिर्यादी जवळ आला व त्याने फिर्यादीचा डावा हात पकडून तिला ढक्कल ढुक्कल केले. त्यामुळे फिर्यादीचा घोटयाजवळ मार लागला व आरोपी याने फिर्यादीच्या भावाचा खुन केला असुन हा संचित रजेवर बाहेर सुटलेला आहे. आरोपी याने फिर्यादीस तु माझे विरोधात तक्रार दिली तर तुझा खुन करीन अशी धमकी दिल्याने फिर्यादीने आरडा ओरडा करून गावातील लोक जमा केल्याने आरोपी हा घटणास्थळावरून पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ५०६, (२) भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी/अजय चौधरी पोलिस स्टेशन बेला मो. नं. ९०२२८४९५८० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**